# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लोकसंख्या रचना : एक अभ्यास

**डॉ. अशोक शहाजी भालेराव**
भूगोल विभाग प्रमुख
चिश्तिया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
खुलताबाद

## प्रस्तावना :

कोणत्याही देशाची अथवा प्रदेशाची लोकसंख्या त्या देशाची साधनसंपदा असते. लोकसंख्या हे महत्त्वाचे संसाधन आहे. प्रदेशाच्या विकासावर, सामाजिक संरचनेवर, अर्थव्यवस्थेवर, सामाजिक प्रगतीवर लोकसंख्येचाच प्रभाव असतो. लोकसंख्येची गुणवत्ता, कार्यक्षमता, शिस्त, बुद्धिमत्ता यावरूनच देशाच्या, प्रदेशाच्या विकासाचा आलेख ठरलेला असतो. लोकसंख्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विकासाचा कणा असतो. लोकसंख्या अभ्यासातून लोकसंख्येची वैशिष्ट्ये समजून घेता येतात. लोकसंख्येची रचना, दर्जा, घनता, विविधता, वितरण, साक्षरता, लिंग गुणोत्तर, वयोगट, सामाजिक, धार्मिक संरचना, या महत्त्वाच्या घटकाचे आकलन होते. यावरून प्रादेशिक नियोजन, विकासाचे आराखडे तयार करता येतात. एकूण विकासासाठी या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात. म्हणूनच लोकसंख्येचा योग्य अभ्यास व त्यावरून नियोजन व व्यवस्थापन केल्यामुळे देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरते. लोकसंख्येची संख्या महत्त्वाची नसून लोकसंख्येची गुणवत्ता, दर्जा कसा आहे या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. साक्षरता, लिंग, व्यवसाय शैक्षणिक पातळी, आरोग्य हे घटक विकासामध्ये निर्णायक ठरत असतात. “छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लोकसंख्या रचना : एक अभ्यास” या अभ्यास घटकाद्वारे लोकसंख्येच्या काही वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## अभ्यासाची उद्दिष्टे :

1) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लोकसंख्येचे तालुका निहाय वितरण अभ्यासणे.
2) लोकसंख्येची घनता अभ्यासणे
3) लोकसंख्येची साक्षरता अभ्यासणे.

## संशोधन पद्धती :

सदरील अभ्यास घटकाच्या अभ्यासासाठी दुय्यम माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. आर्थिक व सामाजिक समालोचन, जिल्हा छत्रपती संभाजीनगर तसेच लोकसंख्येविषयक संदर्भ पुस्तके यांचा उपयोग करण्यात आलेला आहे. आवश्यक तेथे सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आलेला आहे.

**लोकसंख्या अभ्यासाचे महत्त्व :**

लोकसंख्या अभ्यासामुळे लोकसंख्येच्या गरजा आणि समस्या समजतात. यामुळे शिक्षण, आरोग्य इतर आवश्यक सेवांसाठी योजना तयार करण्यासाठी, धोरणे बनविण्यासाठी फायदा होतो. सामाजिक व आर्थिक नियोजन करणे सुलभ होते. पर्यावरण विषयक धोरणे तयार करण्यासाठी, भविष्यकालीन गरजा व आवश्यकता लक्षात घेऊन योग्य नियोजन करण्यासाठी, नैसर्गिक आपत्ती विषयक व्यवस्थापन व नियोजन ठरविण्यासाठी, बेरोजगारी, बेकारी, गरिबी, बालविवाह अशा अनेक सामाजिक समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी मार्गदर्शन मिळते.शासनाला नियोजन तयार करण्यासाठी, संसाधनाचे वाटप करण्यासाठी, आर्थिक विकासाची धोरणे तयार करण्यासाठी, शिक्षण, नोकऱ्या, गृहनिर्माण, रस्ते, आरोग्य सेवा नियोजनासाठी, नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन करण्यासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी, शिक्षण, गरजा,संधी, गुणवत्ता, शिक्षण विषयक धोरणे ठरविण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.


**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लोकसंख्या :**

जगामध्ये लोकसंख्येच्या बाबतीत भारत आघाडीचा देश आहे. त्यात छत्रपती संभाजीनगर जिल्हाही लोकसंख्या वाढीमध्ये अग्रेसर आहे. 1991 ते 2011 दरम्यानच्या जनगणनेनुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर वाढतच आहे. जिल्ह्यातील लोकसंख्येचा राज्यातील वाटा 3.2% आहे राज्यातील लोकसंख्या सरासरी घनता 365 आहे. तर जिल्ह्याची लोकसंख्या सरासरी घनता 366 आहे. वर्ष 2011 नुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 37,01,282 एवढी आहे. 2023 पर्यंत ही लोकसंख्या 40 लाखांच्या जवळ पोहोचेल असे अहवाल सुचित करतो. युएनएफपीए The state of world population Report 2023 या रिपोर्ट ने जाहीर केले आहे. त्यात भारताची लोकसंख्या चीन पेक्षाही अधिक असल्याचं सिद्ध केलं आहे.

या अनुषंगाने जिल्ह्यातील लोकसंख्येचा सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. लोकसंख्येची घनता, वितरण, रचना, लिंग गुणोत्तर, साक्षरता या घटकांच्या अभ्यासामुळे लोकसंख्येच्या गरजा आणि समस्या समजतात. शिक्षण, आरोग्य तसेच इतर आवश्यक सेवांसाठी योजना, ध्येय धोरणे ठरवण्यासाठी, सामाजिक, आर्थिक नियोजनासाठी, तसेच पर्यावरण विषयक धोरणे, भविष्यकालीन गरजा व आवश्यकता यासाठी योग्य नियोजन करण्यासाठी लोकसंख्येचा सविस्तर अभ्यास महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**तक्ता 1 - छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय भौगोलिक क्षेत्र, लोकसंख्या, लोकसांख्येची घनता, साक्षरता व लिंग गुणोत्तर**

| अ.क्र. | तालुका | भौगोलिक.क्षेत्र चौ.कि.मी. | लोकसंख्या | स्त्री | पु. | घनता | साक्षरता % | स्त्री-पु.प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | छसंभाजीनगर | 13060.38 | 15,90,375 | 761403 | 828971 | 1217 | 77.57 | 918 |
| 2 | सिल्लोड | 1189.57 | 359963 | 172940 | 187023 | 303 | 70.44 | 925 |
| 3 | गंगापूर | 1299.34 | 358155 | 171598 | 186557 | 276 | 72.63 | 920 |
| 4 | पैठण | 1425.66 | 347973 | 168233 | 179740 | 244 | 71.45 | 936 |
| 5 | कन्नड | 1500.70 | 341019 | 163379 | 177640 | 227 | 72.65 | 920 |
| 6 | वैजापूर | 1531.48 | 311371 | 150545 | 160826 | 203 | 73.24 | 936 |
| 7 | फुलंब्री | 718.78 | 161012 | 77421 | 83591 | 224 | 72.35 | 926 |
| 8 | खुलताबाद | 511.89 | 118328 | 57103 | 61225 | 231 | 71.94 | 933 |
| 9 | सोयगाव | 653.74 | 113087 | 54191 | 58896 | 174 | 69.36 | 920 |
| 10 | ए.जिल्हा | 10,137.61 | 3701282 | 1828268 | 1873014 | 366 | 79.02 | 923 |




**छत्रपतीसंभाजीनगर जिल्ह्यातील तालुका निहाय भौगोलिक क्षेत्रफळ :**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये क्षेत्रफळाने सर्वात मोठा वैजापूर तालुका असून त्याचे भौगोलिक क्षेत्रफळ 1531.48 चौ.कि.मी.एवढे आहे. क्षेत्रफळाने दुसऱ्या क्रमांकाचा तालुका कन्नड तालुका असून त्याचे क्षेत्रफळ १५००.७७ चौ.कि.मी. आहे. पैठण तालुक्याचे क्षेत्रफळ 1425.66 चौ.कि.मी. असून छत्रपती संभाजीनगर तालुक्याचे क्षेत्रफळ 1306.38 चौ.कि.मी. एवढे आहे. जिल्ह्यामध्ये क्षेत्रफळाने सर्वात लहान तालुका खुलताबाद तालुका असून त्याचे क्षेत्रफळ 511.89 चौ.कि.मी. तर सोयगाव तालुका 653.74 चौ.कि.मी. आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 10137.61 चौ.की.मी. एवढे आहे.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तालुका निहाय लोकसंख्येची घनता** :

जिल्ह्यामध्ये सोयगाव तालुक्याची लोकसंख्येची घनता सर्वात कमी 174 एवढी असून यानंतर वैजापूर तालुका 203 तर फुलंब्री तालुका  लोकसंख्या घनता २२४ एवढी आहे. जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 37 01282 एवढी असून जिल्ह्याची सरासरी लोकसंख्येची घनता 366 एवढी आहे. राज्याची लोकसंख्या घनता 365 आहे तुलनेने जिल्ह्याची लोकसंख्या घनता थोडीशी जास्त आढळून येते.



**छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील तालुका निहाय स्त्री व पुरुष लोकसंख्येचे वितरण :**

जिल्ह्यामध्ये छत्रपती संभाजीनगर तालुक्यामध्ये पुरुषांची संख्या 828971 एवढी तर स्त्रियांची संख्या 7614 0 3 एवढी असून तालुक्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 918 एवढे आहे. जिल्ह्यामध्ये सर्वात कमी स्त्रियांचे प्रमाण छत्रपती संभाजीनगर तालुक्यामध्ये आढळते. सिल्लोड तालुक्यांमध्ये पुरुषांची संख्या 187023 एवढी तर स्त्रियांची संख्या 172940 एवढी असून या तालुक्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 925 असे आहे. सोयगाव तालुक्यामध्ये पुरुषांचे प्रमाण 58896 एवढे असून स्त्रियांची संख्या 54191 एवढी आहे. तर स्त्रियांचे प्रमाण 920 आहे. खुलताबाद तालुका पुरुषांची संख्या 61225 तर स्त्रियांची संख्या 57103 एवढी असून स्त्रियांचे प्रमाण 933 एवढे आहे. वैजापूर तालुक्यामध्ये पुरुषांची संख्या 160826 तर स्त्रियांची संख्या 15 0 545 असून जिल्ह्यामध्ये सर्वाधिक स्त्रियांचे प्रमाण वैजापूर व पैठण तालुक्यामध्ये 936 एवढे आहे. खुलताबाद तालुक्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 933 एवढे आहे. जिल्ह्यामध्ये एकूण पुरुषांची संख्या 1873014 तर स्त्रियांची संख्या 1828268 एवढी असून जिल्ह्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 923 एवढे आहे. राज्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण 929 असून या तुलनेत जिल्ह्यामध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी आढळते.

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील तालुका निहाय साक्षरतेचे प्रमाण :**

जिल्ह्यामध्ये सर्वाधिक साक्षरतेचे प्रमाण छत्रपती संभाजीनगर तालुक्यात 77.57 टक्के एवढे आहे. तर सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण सोयगाव तालुका 69.36%, खुलताबाद तालुका 71.94%, सिल्लोड 70.44% गंगापूर 72.63% कन्नड 72.65 टक्के असे आढळते. जिल्ह्याचे साक्षरतेचे एकूण प्रमाण 79.02 टक्के एवढे आहे. महाराष्ट्र राज्यातील साक्षरतेचे प्रमाण 82.34% असून या तुलनेत जिल्ह्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

**निष्कर्ष :**

1) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ 10137.61 चौ.कि.मी. आहे

2) जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 3701282 (2011 नुसार) आहे.

3) जिल्ह्याची एकूण लोकसंख्येची सरासरी घनता 366 एवढी आहे.

4) जिल्ह्यातील तालुका निहाय सर्वात जास्त भौगोलिक क्षेत्रफळ वैजापूर तालुक्याचे 1531.48 चौ.की.मी. तर सर्वात कमी खुलताबाद तालुका 511.89 चौ.की.मी एवढे आहे.

5) जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या छत्रपती संभाजीनगर तालुक्याची 1590375 आहे, तर सर्वात कमी लोकसंख्या सोयगाव तालुका 113087 एवढी आहे.

6) सर्वात जास्त लोकसंख्येची घनता छत्रपती संभाजी नगर तालुक्याची आहे, तर सर्वात कमी लोकसंख्येची घनता सोयगाव तालुका 174 एवढी आहे.

7) जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त साक्षरतेचे प्रमाण छत्रपती संभाजीनगर तालुका 77.57 टक्के एवढे आहे. तर सर्वात कमी साक्षरतेचे प्रमाण सोयगाव 69.36 टक्के एवढे आहे.

8) जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त लिंग गुणोत्तर पैठण व वैजापूर तालुका 936 एवढे आहे तर सर्वात कमी लिंग गुणोत्तराचे प्रमाण छत्रपती संभाजीनगर तालुका 918 एवढे आहे.

**संदर्भ :**

1) आर्थिक व सामाजिक समालोचन - जिल्हा छत्रपती संभाजीनगर.
2) लोकसंख्या - प्राध्यापक अहिरराव व इतर निराली प्रकाशन, पुणे.
3) लोकसंख्या भूगोल - डॉ. टी. एन. घोलप,निशिकांत प्रकाशन, पुणे.
4) महाराष्ट्राचा भूगोल - दीपस्तंभ प्रकाशन जळगाव श्री. दिलीप बाविस्कर व विकास पाटील
5) विविध शासकीय संकेतस्थळे